सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सविता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२५–२६/८३२ मुदत वाढ दिनांक : १७/०४/२०२६.

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ चे वार्षिक नियतकालिक मुल्यांकनास पाठविण्यास मुदत वाढ.**
**संदर्भ क्र. : या विभागाचे पत्र क्र. विविमं/२०२५–२६/७००, दि. १६/०३/२०२६ चे पत्र.**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेली सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ मध्ये प्रकाशित केलेली अव्यावसायिक व व्यावसायिक विभागातील नियतकालिके तज्ञ समितीद्वारा मुल्यांकनासाठी शुक्रवार, दिनांक १७ एप्रिल, २०२६ पर्यत विद्यार्थी विकास मंडळाकडे पाठविण्याबाबत कळविण्यात आले होते.

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अधिन राहूनच आपल्या महाविद्यालयाने/मान्यताप्राप्त परिसंस्थेने शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ मध्ये प्रकाशित केलेले **नियतकालिक पाठविण्याची मुदत गुरूवार, दिनांक ३० एप्रिल, २०२६ पर्यत वाढविण्यात येत आहे. उपरोक्त संदर्भीय पत्रात नमूद केल्याप्रमाणे आपल्या नियतकालिकात समाविष्ट होणाऱ्या सर्व प्रकारच्या लिखाणाच्या स्रोतांबाबतची माहिती असलेले प्रकटन पत्र (सहपत्र पहावे) आपल्या महाविद्यालयाच्या लेटरहेडवर मा. प्राचार्य आणि संपादक मंडळाच्यावतीने (मा. प्राचार्य/संचालक यांच्या व्यतिरिक्त) अन्य संपादक सदस्य यांनी प्रमाणित करून नियतकालिकासोबत जोडणे अनिवार्य आहे. सदर प्रकटनपत्र अप्राप्त असल्यास नियतकालिक अग्राह्य ठरेल. प्रकटनपत्रासह सदर नियतकालिकाची एक प्रत गुरूवार, दिनांक ३० एप्रिल, २०२६ पर्यत** विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयाकडे पाठविण्यात यावी. **मुदती नंतर प्राप्त नियतकालिक मुल्यांकनाकरिता अग्राह्य ठरतील.**

नियतकालिक शुल्क आकारणाऱ्या सर्व संलग्नित महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्थांनी प्रकाशित केलेल्या नियतकालिकेची एक प्रत विद्यार्थी विकास मंडळ कार्यालयास पाठविणे बंधनकारक आहे.

**वरील मुदत वाढीबाबत आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेतील संबंधितांना अवश्य सूचित करावे. कळावे, ही विनंती.**

सोबत : वरीलप्रमाणे.

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

विद्याविकास

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**विद्यार्थी विकास मंडळ**
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

**डॉ. सविता कुलकर्णी**
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ क्र. विविमं/२०२५–२६/७०० दिनांक : १६/०३/२०२६.

प्रति,
**मा. प्राचार्य/ मा. संचालक,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ च्या वार्षिक नियतकालिकांचे मुल्यांकन.**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेली सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमधून दरवर्षी नियतकालिके प्रकाशित केली जातात. विद्यार्थी, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर सदस्य, विद्यापीठ तथा संबंधित प्रशासन या सर्वांचा आपसात एक मुक्त संवाद या माध्यमातून होत असतो. त्याचबरोबर प्रत्येक क्षेत्रात सहजतेने वावरणाऱ्या आपल्या विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला व्यक्त होण्यासाठी एक मंच या माध्यमातून मिळत असतो. विद्यार्थ्यांच्या सृजनशील शक्तीला तेवढेच विस्तीर्ण अवकाश प्राप्त करून देणारे माध्यम म्हणून या अत्यंत संवेदनशील काळात महाविद्यालयीन नियतकालिकांकडे पाहिले जाते. त्याचबरोबर महाविद्यालय व विद्यार्थ्यांच्या एकंदर प्रगतीचे आणि वाटचालीचे प्रतिरूप यामधून प्रकट होत असते. आधुनिक शैक्षणिक धोरण तसेच संबंधित नियम, कायदे, मार्गदर्शक तत्वे ही विद्यार्थ्यांच्या एकंदरच शैक्षणिक प्रगती बरोबरच त्यांच्यांतील जाणीव–जागृती, मुल्याधारित व मूल्य–शिक्षण, कौशल्य तथा व्यक्तिमत्व विकासासाठी कटिबद्ध आहेत. या क्रमात आपण सर्वजणच आपापल्यापरीने व जबाबदारीने या लक्षपूर्तीसाठी प्रयत्नरत असतो. विद्यार्थ्यांमधील शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच इतर गुणविशेष प्रकाशात आणण्याकरिता त्यांना विविध माध्यमे उपलब्ध करून देत असतो. नियतकालिक हे यासाठीचे एक सशक्त व स्थायी माध्यम म्हणून सर्वांना विश्वासार्ह वाटते आणि हे ध्यानात घेऊन नियतकालिक प्रकाशित करताना महाविद्यालय प्रशासनदेखील तितकेच सजग आणि दक्ष असते.

आपल्या कार्यक्षेत्रात प्रकाशित होणारी नियतकालिके एका वेगळयाच उंचीवर पोहोचलेली दिसून येतात. आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थीदेखील लेखन तसेच अन्य साहित्य कलाप्रकारांतून आपल्या नियतकालिकात व्यक्त होत असतात. त्यातील दर्जेदार, निवडक, सर्वोत्कृष्ट, आश्वासक साहित्यिक विद्यार्थ्यांचे, संपादकांचे, लेखकांचे, कविंचे विद्यापीठाच्या स्तरावरून मुल्यांकन व्हावे, या हेतूने विद्यापीठ स्तरावर प्रकाशनाचा सर्वंकष दर्जा लक्षात घेऊन गुणात्मकदृष्टया सर्वोत्कृष्ट नियतकालिकांची तज्ञ समितीमार्फत निवड केली जाते व विद्यार्थी विकास विभागाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात यांचा गुणगौरव केला जातो.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित असलेली सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ मध्ये प्रकाशित केलेली अव्यावसायिक व व्यावसायिक विभागातील नियतकालिके तज्ञ समितीद्वारा मुल्यांकनासाठी मागविली जात असून या मुल्यांकनासाठी आपल्या **नियतकालिकाची एक प्रत शुक्रवार, दिनांक १७ एप्रिल, २०२६ पर्यंत** या कार्यालयाकडे पाठवावी. सदर मुल्यांकनातून उत्कृष्ट ठरणाऱ्या अव्यावसायिक व व्यावसायिक महाविद्यालय व परिसंस्थांच्या अंकांना खालीलप्रमाणे पारितोषिके देण्यात येतील.

| अव्यावसायिक व व्यावसायिक विभाग | |
|---|---|
| विद्यापीठस्तर | जिल्हास्तर (प्रत्येकी)<br>(पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहमदनगर, नाशिक) |
| प्रथम क्रमांक : रू. १५,०००/– | प्रथम क्रमांक : रू. ७,०००/– |
| द्वितीय क्रमांक : रू. १२,०००/– | द्वितीय क्रमांक : रू. ६,०००/– |
| तृतीय क्रमांक : रू. १०,०००/– | तृतीय क्रमांक : रू. ५,०००/– |
| चतुर्थ क्रमांक : रू. ०८,०००/– | ———————————————— |

१) **आपल्या महाविद्यालयाच्या नियतकालिकात समाविष्ट होणाऱ्या सर्व प्रकारच्या लिखाणाच्या स्रोतांबाबतची माहिती असलेले प्रकटन पत्र (सहपत्र पहावे) आपल्या महाविद्यालयाच्या लेटरहेडवर मा. प्राचार्य आणि मा. संपादक मंडळाच्यावतीने (मा. प्राचार्य/मा.संचालक यांच्या व्यतिरिक्त) अन्य संपादक सदस्य यांनी प्रमाणित करून नियतकालिकासोबत जोडणे अनिवार्य आहे. सदर प्रकटनपत्र अप्राप्त असल्यास नियतकालिक अग्राह्य ठरेल.**

२) महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थांद्वारे प्रकाशित करण्यात आलेले नियतकालिक या विभागाच्या परिपत्रक क्र. ३६८/०९, दि. १२ नोव्हेंबर, २००९ च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार असावे.

३) मुल्यांकनाच्या संदर्भात नियुक्त तज्ञ समिती तथा परीक्षकांनी दिलेला निर्णय अंतिम राहील.

४) नियतकालिक शुल्क आकारणाऱ्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्थांनी दरवर्षी नियतकालिक प्रकाशित करणे व त्याची **एक प्रत** या कार्यालयास पाठविणे बंधनकारक आहे. (असे शुल्क न आकारणारी महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांनी देखील विद्यार्थी हिताच्या दृष्टीने वार्षिक नियतकालिक प्रकाशित करावे व त्याची **एक प्रत** विहित कालावधीत या कार्यालयाकडे पाठवून या उपक्रमात सहभागी व्हावे, ही अपेक्षा!)

५) *'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६'* अन्वये विद्यार्थी विकासाचे उद्दिष्ट लक्षात घेता विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व परिसंस्थांनी विद्यार्थ्यांच्या सहभागातून आकाराला येणारे वार्षिक नियतकालिक प्रकाशित करणे अनिवार्य असून त्यानुसार आपण कार्यवाही करावी.

६) वार्षिक नियतकालिक प्रकाशित करून त्यांची एक प्रत विहित कालावधीत जमा केल्याशिवाय आपल्या महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्थेचे विद्यार्थी विकास विभागाशी संबंधित कोणतेही अनुदान लेखे स्विकारले तथा तपासले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी.

७) **मुदती नंतर प्राप्त नियतकालिक मुल्यांकनाकरिता अग्राह्य ठरतील.**

**यानुसार प्रस्तुत पत्राच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ कालावधीतील आपल्या स्तरावरील निर्मित व प्रकाशित नियतकालिकांची एक प्रत शुक्रवार, दिनांक १७ एप्रिल, २०२६ पर्यंत या कार्यालयाकडे पाठवावी**. कळावे, ही विनंती.

नियतकालिकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची साहित्यिक अभिव्यक्ति अधिकाधिक उन्नत व्हावी व लेखन संस्कृती वृद्धिंगत व्हावी हे नियतकालिक उपक्रमाचे सकारात्मक उद्दिष्ट गाठण्यासाठी आपण आपल्यास्तरावर विद्यार्थी तसेच सर्व लेखक प्रतिनिधींना प्रोत्साहन दयावे, ही विनंती.

सोबत : प्रकटन पत्र व नियतकालिक नियमावली.

(डॉ. सविता कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

**आपल्या महाविद्यालय/परिसंस्थेच्या (शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५) नियतकालिकात समाविष्ट होणाऱ्या सर्व प्रकारच्या लिखाणाच्या स्रोतांबाबतची माहिती असलेले खालील प्रकटन पत्र आपल्या महाविद्यालय/ परिसंस्थेच्या लेटरहेडवर मा. प्राचार्य आणि संपादक मंडळाच्यावतीने अन्य संपादक सदस्य यांनी प्रमाणित करून नियतकालिकासोबत जोडणे अनिवार्य आहे.**

..........................................................................................................................................

## प्रकटन पत्र

दिनांक :

महाविद्यालय/परिसंस्थेचे नाव : ..........................................................................................
..........................................................................................................................................

नियतकालिक नाव : ..........................................................................................

नियतकालिक वर्ष : शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५

नियतकालिकाचा विषय व आशय : ..........................................................................................
..........................................................................................

| अ. क्र. | लेख | लेखकाचे नाव | पदनाम (विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी अथवा इतर) | लिखाणाचा स्रोत (स्वलिखित, आधारित, अनुवादित, रूपांतरित, भाषांतरित अथवा इतर संदर्भ, दाखला, अनुभव इत्यादीवर आधारित) नमूद करणे अनिवार्य आहे. |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

स्वाक्षरी : ..................................................

नाव : ......................................................

संपादक मंडळाच्यावतीने मा. प्राचार्य/संचालक यांच्या व्यतिरिक्त अन्य संपादक (सदस्य)

मोहोर

प्राचार्य/संचालक
(स्वाक्षरी)

# पुणे विद्यापीठ

## विद्यार्थी कल्याण मंडळ

: परिपत्रक क्र.३६८/०९ :

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार महाविद्यालय / मान्यताप्राप्त संस्थांद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या वार्षिक अंकात (नियकालिक) सुसुत्रता आणण्यासाठी विद्यापीठाने तयार केलेली मार्गदर्शक तत्वे खालीलप्रमाणे आहेत. या निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २००९–१० पासून करण्यात येत आहे.

**अ) प्रकाशनपूर्व तयारी :**

१ महाविद्यालयाच्या वार्षिक अंकाची तयारी महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्षाच्या कामकाजाच्या पहिल्या दिवसापासूनच व्हावी.

२ विद्यार्थी हा केंद्रबिदू मानून अंकाची मांडणी करावी. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी लेखनविषयक कार्यशाळा, भित्तिपत्रके, रीडर्स क्लब अशा उपक्रमांची मदत घ्यावी. विद्यार्थी–प्रतिनिधींना संपादक मंडळात स्थान द्यावे.

३ संपादक–मंडळाची रचना खालीलप्रमाणे असावी :

१) प्राचार्य
२) शाखानिहाय प्राध्यापक–प्रतिनिधी
३) ग्रंथपाल
४) विद्यार्थी–प्रतिनिधी
५) महिला प्रतिनिधी

४ वार्षिक अंकाच्या मांडणीमध्ये सौंदर्यदृष्टी व्यक्त व्हावी.मुखपृष्ठासाठी विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा घ्यावी.

**ब) प्रकाशनकालीन कार्य :**

**१) उद्देश :**

१) महाविद्यालयाच्या बाह्य व अंतर्गत स्वरूपाचा परिचय विद्यार्थी जगतात व समाजात करून देणे.

२) महाविद्यालयाची संपूर्ण प्रशासकीय माहिती, रचनात्मक स्थिती, विविध शैक्षणिक, शिक्षणपूरक व शिक्षणेतर उपक्रमांची माहिती समाविष्ट करणे, तसेच महाविद्यालयाची वाटचाल व भविष्यकालीन योजना यांची माहिती देणे.

३) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण सर्जनशीलतेसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे.

४) महाविद्यालयाचे व्हिजन व मिशन यांचा वार्षिक अंकात अंतर्भाव करुन त्यानुसार अंकाची रचना करणे.

## २) स्वरूप :

### अ) बाह्य स्वरूप –

१) प्रकाशित स्वरूपातील आकार १/४ क्राऊन (९॥'' X ७॥'' इंच ) असावा.

२) कव्हर (मुखपृष्ठ) ३०० जीएसएम आर्टपेपर असावा.

३) फोटो (रंगीत छायचित्रे ) – कलर फोटो ३०० डीपीआय व ब्लॅक अॅण्ड व्हाइटची २०० डीपीआय असावीत.

४) बांधणी – परफेक्ट बाइंडिंग असावे.

### ब) कव्हर पाने :

१) क्र. १ (मुखपृष्ठ) वर नियतकालिकाचे नाव, महाविद्यालयाचे नाव व महाविद्यालयाचा लोगो (फोटोसह),पुणे विद्यापीठ संलग्नित (ID नंबरसहित) लिहावे.

२) क्र. ४ (मलपृष्ठ) वर महाविद्यालयाची ठळक वैशिष्ट्ये, महाविद्यालयाचे नाव, पत्ता, दूरध्वनी, फॅक्स, इ–मेल, वेबसाइट, महाविद्यालयाचा फोटो, इ. यावे.

३) क्र. २ व ३ वर विशेष फोटो यावेत.

### क) अंतर्गत स्वरूप –

संपूर्ण वार्षिक अंकात विद्यार्थी : शिक्षक–शिक्षकेतर सेवक यांचा सहभाग ८०:२० असावा.

१) पृष्ठे किमान ६४ असावीत. रंगीत पृष्ठ १७० जीएसएम आर्टपेपर, साधे पृष्ठ ८० जीएसएम मॅपलिथो असावे.

२) फॉण्ट – आतील मराठी मजकुरासाठी श्री लिपी वापरावी (१४ पॉइंट साइज) आणि इंग्रजी मजकुरासाठी टाइम्स न्यू रोमन (१२ पॉइंट साइज) वापरावा.

३) समास – पानाच्या ३ बाजूने अर्धा इंच (12mm) समास सोडावा व बांधणीच्या बाजूने पाऊण इंच (18mm) समास सोडावा. प्रत्येक सम पानावर डावीकडे वरच्या बाजूला महाविद्यालयाचे नाव व विषम पानावर उजवीकडे नियतकालिकाचे नाव नमूद करावे. पानाच्या तळाशी मधोमध पृष्ठक्रमांक असावा. सदर छपाईसाठी लागणाऱ्या प्लेट्स पॉझिटिव्हपासून बनलेल्या असाव्यात किंवा CTP (कॉम्प्यूटर टू प्लेट्स) असाव्यात.

४) ट्रेसिंग पूर्णत: टाळावे.

५) लेखनाच्या शुद्धतेकडे पूर्णत: लक्ष द्यावे.

६) छपाईला देताना : (१) मूळ प्रतींचा क्रम लावणे, (२) प्रेसकडून आलेल्या प्रिंट–आउट्समधील पानांची मांडणी तपासणे, (३) प्रिंट–आउट्समधील शुद्धलेखन तपासणे. या तीन बाबी तपासून मगच छपाईसाठी देणे.

## ३) अंतरंग :

१) प्राचार्यांचे मनोगत

२) संपादकीय

३) प्रशासकीय माहिती

४) संस्थेची कार्यकारिणी

५) महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ च्या कलम ८५(१) अन्वये कार्यरत असलेली स्थानिक समिती.

६) महाराष्ट्र कायदा, १९९४ कलम ४०(२) (बी) नुसार शैक्षणिक वर्षात कार्यरत असलेली विद्यार्थी परिषद, विद्यार्थ्यांचा प्रवेश, निकाल, प्रावीण्य यांविषयीची सांख्यिकीय माहिती समाविष्ट असावी. महाविद्यालयाशी संलग्नित कनिष्ठ महाविद्यालय (असल्यास) त्याचा समावेश करावा.

७) वार्षिक अंक **एप्रिलअखेर** प्रकाशित करण्यात यावा. तो अंक प्रवेशित विद्यार्थ्याला देण्यात यावा.

## ४) अहवाल :

अहवालासाठी नॅक सूचित सूत्रांचा वापर करावा. शैक्षणिक, शिक्षणपूरक व शिक्षणेतर विविध समित्यांचा अहवाल त्यात समाविष्ट करावा. त्यात संबंधित शैक्षणिक वर्षातील घटनांची नोंद असावी. अहवालात शेवटी महाविद्यालयातील सेवानिवृत्तांची नोंद करण्यात यावी.

## ५) लेखन (मजकूर) :

१) लेखन विविध भाषांमध्ये असल्यास भाषानुरूप स्वतंत्र विभागीय मांडणी असावी.

२) शक्यतो लेखनासाठी एखादे आशयसूत्र (Theme) निवडावे.

३) विद्यार्थ्यांचे सर्व लेखन स्वत:चेच असावे. ललित लेखन, वैचारिक, संशोधनपर लेखन (संदर्भ सूचीसह) समाविष्ट असावे.

४) संग्राहक म्हणून दिलेला मजकूर टाळावा. पानपूरकांच्या माध्यमातून वाचकांना दर्जेदार विनोद व महत्त्वाची माहिती पुरवावी.

५) श्रद्धांजलीचे उल्लेख शेवटी असावेत.

६) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या विशेष कामगिरीचा उल्लेख अंकात असावा.

## ६) फोटो :

१) कार्यक्रमांचे ॲक्शन फोटो असावेत.

२) संस्थेचे आधारस्तंभ, संस्थाचालक, मार्गदर्शक, संपादक–मंडळ आणि प्राध्यापक तसेच नैपुण्यप्राप्त विद्यार्थी यांची छायाचित्रे समाविष्ट करावीत.

३) परिसराशी निगडित विशेष फोटो (ऐतिहासिक, भौगोलिक, सामाजिक संदर्भातील) समाविष्ट करावेत.

४) महाविद्यालयांशी संबंधित प्रसिध्दीची कात्रणे कोलाजच्या स्वरुपात शक्य असल्यास समाविष्ट करावीत.

७) **जाहिरात :**

नियकालिकाच्या वार्षिक अंकात योग्य जाहिराती असाव्यात.

## क) प्रकाशनोत्तर कार्य :

१) अंक महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर (वेबसाईट) उपलब्ध व्हावा.
२) प्राचार्य व प्राध्यापक यांचे E-mail आणि संपर्क दूरध्वनी क्रमांक छापावेत.
३) अंकाचे प्रकाशन समारंभपूर्वक करावे. या समारंभात अंकाच्या संपादक–मंडळास प्रशस्तिपत्रक द्यावे, व प्रकाशन–समारंभाच्या वृत्तांताचा पुढील अंकात समावेश असावा.

**वरील परिपत्रकाचा आशय संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.**

विद्यार्थी कल्याण मंडळ
गणेशखिंड, पुणे – ७
दिनांक : १२ नोव्हेंबर, २००९
जावक क्र. : ६५१/०९

संचालक,
विद्यार्थी कल्याण मंडळ

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :
१) मा. व्यवस्थापन परिषद सदस्य
२) मा. अभिसभा सदस्य
३) मा. विद्यापरिषद सदस्य
४) मा. विद्यार्थी कल्याण मंडळ सल्लागार समिती सदस्य
५) मा. प्रायार्च/संचालक, संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था